पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

ह क्षेत्रिय कार्यालय, कासारवाडी – ४११०३४

मा. ह प्रभाग समिती सभा

कार्यपत्रिका क्र. – ०७

सभावृत्तांत

दिनांक –०३/०३/२०२२ दुपारी-०२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.ह प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ०३/०३/२०२२ रोजी दुपारी ०२.०० वा. ह क्षेत्रिय कार्यालयाच्या पं. दिनदयाळ उपाध्याय सभागृह येथे आयोजीत करण्यात आली. त्यास खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) मा.अंबरनाथ चंद्रकांत कांबळे | - | सभापती |
| २) मा.सुजाता सुनिल पालांडे | - | सदसया |
| ३) मा.आशा धायगुडे – शेडगे | - | सदस्या |
| ४) मा. काटे स्वाती (माई) चंद्रकांत | - | सदस्या |
| ५) मा.रोहीत (आप्पा) सुदाम काटे | - | सदस्य |
| ६) मा. राजापुरे माधवी राजेंद्र | - | सदस्या |
| ७) मा. चौगुले सिमा दत्तात्रय | - | सदस्या |
| ८) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे | - | सदस्या |
| ९) मा. थोरात ज्ञानेश्वर मुरलीधर | - | स्विकृत सदस्य |
| १०) मा.कणसे संजय गुलाब | - | नामनिर्देशित सदस्य |

याशिवाय मा.क्षेत्रीय अधिकारी श्री.विजयकुमार थोरात,क्षेत्रिय अधिकारी ह प्रभाग , श्री.सुपे ए.के. – लेखाधिकारी, श्री.दिलीप धुमाळ, विद्युत विभाग, श्री.विजयसिंह भोसले उपअभियंता स्थापत्य, श्री .संतोष दुर्गे, उप अभियंता, श्री.महेश एन.आढाव, मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री. चंद्रकांत आ.मोरे, उप.अभियंता पाणीपुरवठा/ स्मार्टसिटी, श्री. दांगडे एस.डी. उप अभियंता, हरिदास सुनिल जगन्नाथ, उपअभियंता झोनिपु,(स्थापत्य)श्री. शिंदे विजयकुमार बी, उपअभियंता, श्री. भंडारी एस.पी. क.अ.पाणी पुरवठा,श्री.दिपक कोटीयाना,आ.नि.पशुवैदयकीय, श्री.महेंद्र देवरे, क.अभियंता,स्थापत्य, श्री. सचिन मच्छिंद्र मगर, क.अभियंता स्थापत्य,श्री.दिग्विजय पवार, क अभियंता,श्री.विजय कांबळे, क.अभियंता,(स्थापत्य), पाणी पुरवठा, शाम गर्जे, क.अ.पाणी पुरवठा, श्रीम.नम्रता मगर, उदयान अधिकारी, श्री.कडाळे एस.एन, उदयान सहाय्यक.उदयान,श्री.प्रमोद रामकृष्ण निकम, सहा.सुरक्षा अधिकारी,बापुसाहेब एकनाथ लिम्हण,सुरक्षा निरीक्षक, श्री. आर. रोकडे, मुख्य अरोग्य निरीक्षक, श्रीम.जयश्री.साळवे, क्रिडा पर्यवेक्षक, श्री.उध्दव.डवरी, आ.नि. प्र.क्र. ३१, श्रीम.आर.जी.तुंडलवार प्र.क्र.३२, ममता सुदाम राठोड, आ.नि.प्र.२०,श्री. विजयकुमार तु. उईके, विजपर्यवेक्षक विदयुत, हे उपस्थित होते

----------

CamScanner

मा.क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव : माहे मार्च २०२२ च्या दिनांक ०३/०३/२०२२ रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

मा. सभापती – सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात करणेत येत आहे.
मा. सभापती : सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.
तदनंतर माहे मार्च २०२२ च्या दिनांक ०३/०३/२०२२ रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळाली. माहे मार्च २०२२ च्या नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले .
मा.क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव : मागील सभा कार्यपत्रिका क्र. ०५ माहे फेब्रुवारीचा सभावृत्तांत कायम करणेस मान्यता मिळावी.
मा.सभापती - मागील सभा कार्यपत्रिका क्र. ०५ माहे फेब्रुवारीचा सभावृत्तांत कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

-----------

**मा. सभापती : – सन्मा.सदस्य यांनी सादर केलेले ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.**

----------

विषय क्र.१) कासारवाडी येथील सर्वे क्र.४९७/२अ, येथील कै. तानाजी पांडूरंग लांडगे क्रिडांगणास, कबडडीपटू कै. तानाजी पांडूरंग लांडगे हे नांव देणेबाबत श्री.राजू विश्वनाथ बनसोडे यांचे दिनांक ०३/०२/२०२२ रोजीचे पत्र

विषय क्र. २) कासारवाडी येथील सर्वे क्र.४९७/२अ, येथील कै. तानाजी पांडूरंग लांडगे क्रिडांगण येथे चौकामध्ये व क्रिडांगणाच्या दोनही कमान (प्रवेशद्वार)सुशोभिकरण करणेबाबत.श्री.राजू विश्वनाथ बनसोडे यांचे दिनांक ०३/०२/२०२२ रोजीचे पत्र.

विषय क्र.३) भाजी मंडईस नांव देणेबाबत, श्रीम.आशा धायगुडे-शेंडगे यांचा दि. ०३/०३/२०२२ रोजीचा अर्ज.

विषय क्र.४) एम.के.चौक येथील शुशोभिकरणाबाबत.श्रीम.सीमा चौघुले यांचा दि. ०३/०३/२०२२ चा अर्ज.

विषय क.५) नवज्योत मित्र मंडळ येथे व्यायामशाळा बांधणेबाबत. श्री.राजु बनसोडे यांचे दि.०३/०३/२०२२ चा अर्ज.

विषय क.६) रोहीतराज युवा प्रतिष्ठान या संस्थेस दापोडी येथील वाहनतळ चालविण्यास मिळणेबाबत. रोहीतआप्पा सुदाम काटे यांचे दि. ०३/०३/२०२२ चा अर्ज.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

----------

ठराव क्र. -१३

दिनांक : ०३/०३/२०२२

सूचक- मा.राजु बनसोडे

विषय क्र. – ०१

विभाग : -

अनुमोदक - मा. स्वाती (माई)काटे

संदर्भ - कासारवाडी येथील सर्वे क्र.४९७/२अ, येथील कै. तानाजी पांडूरंग लांडगे क्रिडांगणास, कबडडीपटू कै. तानाजी पांडूरंग लांडगे हे नांव देणेबाबत श्री.राजू विश्वनाथ बनसोडे यांचे दिनांक ०३/०२/२०२२ रोजीचे पत्र

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

ह क्षेत्रिय कार्यालय, कासारवाडी – ४११०३४

मा. ह प्रभाग समिती सभा

कार्यपत्रिका क्र. – ०७

सभावृत्तांत

दिनांक –०३/०३/२०२२

दुपारी-०२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.ह प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ०३/०३/२०२२ रोजी दुपारी ०२.०० वा. ह क्षेत्रिय कार्यालयाच्या पं. दिनदयाळ उपाध्याय सभागृह येथे आयोजीत करण्यात आली. त्यास खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) मा.अंबरनाथ चंद्रकांत कांबळे | - | सभापती |
| २) मा.सुजाता सुनिल पालांडे | - | सदसया |
| ३) मा.आशा धायगुडे – शेडगे | - | सदस्या |
| ४) मा. काटे स्वाती (माई) चंद्रकांत | - | सदस्या |
| ५) मा.रोहीत (आप्पा) सुदाम काटे | - | सदस्य |
| ६) मा. राजापुरे माधवी राजेंद्र | - | सदस्या |
| ७) मा. चौगुले सिमा दत्तात्रय | - | सदस्या |
| ८) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे | - | सदस्या |
| ९) मा. थोरात ज्ञानेश्वर मुरलीधर | - | स्विकृत सदस्य |
| १०) मा.कणसे संजय गुलाब | - | नामनिर्देशित सदस्य |

याशिवाय मा.क्षेत्रीय अधिकारी श्री.विजयकुमार थोरात,क्षेत्रिय अधिकारी ह प्रभाग , श्री.सुपे ए.के. – लेखाधिकारी, श्री.दिलीप धुमाळ, विद्युत विभाग, श्री.विजयसिंह भोसले उपअभियंता स्थापत्य, श्री .संतोष दुर्गे, उप अभियंता, श्री.महेश एन.आढाव, मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री. चंद्रकांत आ.मोरे, उप.अभियंता पाणीपुरवठा/ स्मार्टसिटी, श्री. दांगडे एस.डी. उप अभियंता, हरिदास सुनिल जगन्नाथ, उपअभियंता झोनिपु,(स्थापत्य)श्री. शिंदे विजयकुमार बी, उपअभियंता, श्री. भंडारी एस.पी. क.अ.पाणी पुरवठा,श्री.दिपक कोटीयाना,आ.नि.पशुवैदयकीय, श्री.महेंद्र देवरे, क.अभियंता,स्थापत्य, श्री. सचिन मच्छिंद्र मगर, क.अभियंता स्थापत्य,श्री.दिग्विजय पवार, क अभियंता,श्री.विजय कांबळे, क.अभियंता,(स्थापत्य), पाणी पुरवठा, शाम गर्जे, क.अ.पाणी पुरवठा, श्रीम.नम्रता मगर, उदयान अधिकारी, श्री.कडाळे एस.एन, उदयान सहाय्यक.उदयान,श्री.प्रमोद रामकृष्ण निकम, सहा.सुरक्षा अधिकारी,बापुसाहेब एकनाथ लिम्हण,सुरक्षा निरीक्षक, श्री. आर. रोकडे, मुख्य अरोग्य निरीक्षक, श्रीम.जयश्री.साळवे, क्रिडा पर्यवेक्षक, श्री.उध्दव.डवरी, आ.नि. प्र.क्र. ३१, श्रीम.आर.जी.तुंडलवार प्र.क्र.३२, ममता सुदाम राठोड, आ.नि.प्र.२०,श्री. विजयकुमार तु. उईके, विजपर्यवेक्षक विदयुत, हे उपस्थित होते

CamScanner

मा.क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव : माहे मार्च २०२२ च्या दिनांक ०३/०३/२०२२ रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

मा. सभापती – सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात करणेत येत आहे.

मा. सभापती : सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

तदनंतर माहे मार्च २०२२ च्या दिनांक ०३/०३/२०२२ रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळाली. माहे मार्च २०२२ च्या नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले .

मा.क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव : मागील सभा कार्यपत्रिका क्र. ०५ माहे फेब्रुवारीचा सभावृत्तांत कायम करणेस मान्यता मिळावी.

मा.सभापती - मागील सभा कार्यपत्रिका क्र. ०५ माहे फेब्रुवारीचा सभावृत्तांत कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

-----------

मा. सभापती : – सन्मा.सदस्य यांनी सादर केलेले ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

----------

विषय क्र.१) कासारवाडी येथील सर्वे क्र.४९७/२अ, येथील कै. तानाजी पांडूरंग लांडगे क्रिडांगणास, कबडडीपटू कै. तानाजी पांडूरंग लांडगे हे नांव देणेबाबत श्री.राजू विश्वनाथ बनसोडे यांचे दिनांक ०३/०२/२०२२ रोजीचे पत्र

विषय क्र. २) कासारवाडी येथील सर्वे क्र.४९७/२अ, येथील कै. तानाजी पांडूरंग लांडगे क्रिडांगण येथे चौकामध्ये व क्रिडांगणाच्या दोनही कमान (प्रवेशद्वार)सुशोभिकरण करणेबाबत.श्री.राजू विश्वनाथ बनसोडे यांचे दिनांक ०३/०२/२०२२ रोजीचे पत्र.

विषय क्र.३) भाजी मंडईस नांव देणेबाबत, श्रीम.आशा धायगुडे-शेंडगे यांचा दि. ०३/०३/२०२२ रोजीचा अर्ज.

विषय क्र.४) एम.के.चौक येथील शुशोभिकरणाबाबत.श्रीम.सीमा चौघुले यांचा दि. ०३/०३/२०२२ चा अर्ज.

विषय क.५) नवज्योत मित्र मंडळ येथे व्यायामशाळा बांधणेबाबत. श्री.राजु बनसोडे यांचे दि.०३/०३/२०२२ चा अर्ज.

विषय क.६) रोहीतराज युवा प्रतिष्ठान या संस्थेस दापोडी येथील वाहनतळ चालविण्यास मिळणेबाबत. रोहीतआप्पा सुदाम काटे यांचे दि. ०३/०३/२०२२ चा अर्ज.

----------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

----------

ठराव क्र. -१३ | विषय क्र. – ०१

दिनांक : ०३/०३/२०२२ | विभाग : -

सूचक- मा.राजु बनसोडे | अनुमोदक - मा. स्वाती (माई)काटे

संदर्भ - कासारवाडी येथील सर्वे क्र.४९७/२अ, येथील कै. तानाजी पांडूरंग लांडगे क्रिडांगणास, कबडडीपटू कै. तानाजी पांडूरंग लांडगे हे नांव देणेबाबत श्री.राजू विश्वनाथ बनसोडे यांचे दिनांक ०३/०२/२०२२ रोजीचे पत्र

CamScanner

उपरोक्त विषयांनव्ये सर्वे क्र.४९७/२अ,कै.तानाजी पांडूरंग लांडगे क्रिडांगण या नावाचा ठराव "" प्रभाग समितीमध्ये ठराव क्र.३२ दिनांक ०३/०१/२०१९ रोजी करण्यात आला त्यामध्ये चुकुन कै.तानाजी पांडूरंग लांडगे क्रिडांगण या नांवापुढे कबड्डीपटू असा नामोल्लेख करण्याचा राहिला असुन कृपया या नावापुढे कबडडीपटू असा नामोल्लेख करावा.

कै.तानाजी पांडूरंग लांडगे उत्तम प्रकारचे कबड्डीपटू होते ते भैरवनाथ कबड्डी संघातून शहरात व राज्यात उत्तम प्रकारे कबड्डी खेळत होते.

ते कबड्डीपटू होते याचा पुरावा त्यांचा मुलगा, भाऊ व गावातील जेष्ठ नागरीक यांच्याद्वारे फोटो प्रत पाहुन व शहानिशा करुन माहिती घेतली आहे.

तरी त्यांच्या नावापुढे कबड्डीपटू हे नांव करुन, कबड्डीपटू कै.तानाजी पांडूरंग लांडगे क्रिडांगण असे नांव देण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदरचा विषय मा.महापालिका सभेच्या मंजूरीकामी पाठवणेकरीता शिफारस करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्र. -१४ विषय क्र. – ०२

दिनांक : ०३/०३/२०२२ विभाग : -

सूचक- मा. मा.राजु बनसोडे अनुमोदक - मा. स्वाती (माई)काटे

संदर्भ - कासारवाडी येथील सर्वे क्र.४९७/२अ, येथील कै. तानाजी पांडूरंग लांडगे क्रिडांगण येथे चौकामध्ये व क्रिडांगणाच्या दोनही कमान (प्रवेशद्वार)सुशोभिकरण करणेबाबत.श्री.राजू विश्वनाथ बनसोडे यांचे दिनांक ०३/०२/२०२२ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयांनव्ये कासारवाडी येथील सर्वे क्र.४९७/२अ, येथील कै. तानाजी पांडूरंग लांडगे क्रिडांगणाच्या दोनही कमानीस कै.तानाजी पांडूरंग लांडगे हे नांव सुशोभित करावे. तसेच क्रिडांगणाच्या एका कमानिस (मुर्तीकार) कै.संजयकुमार सदाशिव लांडगे हे नाव सुशोभित करण्यात यावे.

तसेच क्रिडांगणाच्या चौकामध्ये सुर्य महादेव मंदिराच्या समोर कै.तानाजी पांडूरग लांडगे क्रिडांगण हे नांव सुशोभित करुन तेथे कब्बडीपटू, क्रिकेट, कुस्ती व इतर खेळांची प्रतिमा तयार करुन सुशोभित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्र. -१५ विषय क्र. – ०३

दिनांक : ०३/०३/२०२२ विभाग : -

सूचक- मा.श्रीम.आशा धायगुडे-शेडगे अनुमोदक - मा.श्रीम.सीमा.चौगुले

संदर्भ - भाजी मंडईस नांव देणेबाबत मा.श्रीम.आशा धायगुडे-शेडगे यांचा दि. ०३/०३/२०२२ चा अर्ज.

उपरोक्त विषयांस अनुसरुन प्रभाग क्रमांक ३० मधील कासारवाडी परीसरातील शास्त्रीनगर मधील भाजी मंडई "जवळकर सुंचंद्राई"असे नांव देण्यांस मान्यता देण्यात आली आहे. सदरचा विषय मा. महापालिका सभेच्या मंजुरीकामी पाठवणेकरीता शिफारस करण्यात यत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्र. -१६ विषय क्र. – ०४

दिनांक : ०३/०३/२०२२ विभाग : -

सूचक- मा. श्रीम.सीमा.चौगुले अनुमोदक - मा. माधवी राजापुरे

संदर्भ - एम.के.चौक येथीन सुशोभिकरणा बाबत.श्रीम.सीमा चौघुले यांचा दि. ०३/०३/२०२२ चा अर्ज.

CamScanner

**मा.क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव** -मॅडम काही अडचण आली तर मला सांगत जा.

**मा.सुजाता सुनिल पालांडे** - - मॅडम दहा वर्ष झालीत आम्हाला नगरसेवक होऊन, एवढयाशा कामाला आम्हाला प्रभागात बोलावे लागते आमचे दुर्दैवी आहे. आम्ही कुठेतरी कमी पडत आहोत. ते काम माझे घरातले नाही ते एका बागेतले आहे. त्या झाडावर किडे झाले आहे. तिथल्या लोकांना ते चावतात ते लोक बिचारे रोज मलम लाव, औषधोपचार कर, इंजेक्शन घे तुम्हाला काम नसेल करायचं तर मला सांगा थोरात साहेब.

**मा.सभापती** – प्रॉब्लेम काय आहे.

**मा.सुजाता सुनिल पालांडे** - तुम्ही दोघे मिटींगला नका बसू. तुमच्यात अखत्यारित काहीच नसेल तर तुम्ही का बसता मिटींगला पाठवा गोसावींना आम्ही बोलू गोसावीना. सदर गोसावी साहेबांना बोलवा येथे.

**मा. चौगुले सिमा दत्तात्रय** – आमच्या पण फेमस चौकात खूप फांदया वाढल्या आहेत.

**मा.आशा धायगुडे – शेडगे** – मा. अध्यक्ष, मा. थोरात साहेब, मा. अध्यक्षांनी त्यांची पहिली ट्रम असताना त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारचे काम केले आहे. गोसावी साहेबांच्या या बेसिक गोष्टी आहेत. कडाळे मी तुम्हाला परवा कॉल केला तर माझ्याकडेची कामे होतात का१ नो डाउट होतात. मी तुम्हाला सांगितले फांद्या तोडा तर नक्की तोडल्या जातात मला एवढेच सांगायचे आम्हाला तुम्हाला ही कामे सांगावी का लागतात. आमच्या अध्यक्षांचे खरेच खूप कौतुक केले पाहिजे त्यांनी प्रशासनात चांगली पकड पकड घेतली आहे. त्यांना असे वाटते नगरसेवक आले पाहिजे मिटींगला. त्यांच्या मिटींगला नगरसेवकांची संख्या जास्त असते कारण आम्ही सांगितलेली कामे ते आमच्या समस्या वर उपाय योजना करण्यात संबंधित डिपार्टमेंट च्या मागे लागून कामे करून देण्याचा प्रयत्न करतात. ही शेवटची मिटींग आहे आज सगळे गोड गोड झाले पाहिजे असे मला वाटत होते. परंतु मला आज जलपर्णी वर बोलायला लागले. गेल्यावर्षी चांगली जलपर्णी निघाली या वर्षी तसेच निघावी अशी अपेक्षा करते. शुल्क गोष्टीसाठी बोलावे लागते वाद घालावा लागतो त्या वेळेस वाईट वाटते. शेवटच्या सभेपर्यंत आम्ही आमच्या अडचणी सांगत आहोत. जर हेच करायचे तर आम्ही काय मिळावले. अध्यक्ष महोदय खरेतर तुमचे पुन्हा एकदा मनापासून अभिनंदन करते आणि थांबते.

**मा.सुजाता सुनिल पालांडे** - गोसावी आलेत का१

**मा.सभापती** – तुम्ही गोसावी साहेब यांना बोलावून घ्या. आम्ही सर्व नगरसेवकांनी सांगूनही तुम्ही कामे करत नसाल किंवा होत नसेल तर आम्ही आपल्यापेक्षा मोठे अधिकाऱ्याला सांगितले पाहिजे होते. आपले क्षेत्रीय कार्यालयांची एक वैशिष्ट्य आहे आपली एकही मीटिंग दुसऱ्या महिन्यात झालेली नाही. ती प्रत्येक महिन्याला झालेली आहे. तुम्हाला एवढे माहीत असून, नगरसेवक तुम्हाला बोलतात. असे करा तसे करा तर तुम्ही ॲक्शन घ्यायला पाहिजेना. तुम्ही का गप्प बसता. शेवटच्या मिटींगला जर बोलणे खात असाल तर चांगले नाही. तुमचे काम नाही बोलायचं झाले पाहिजे. तुम्ही पाच वाजू द्या सात वाजू द्या गोसावी साहेबांना बोलून घ्या.

**मा.क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव** - मगर मॅडम निवेदचा काय विषय पेंडींग आहे.

**श्रीम.नम्रता मगर, उदयान अधिकारी** – सर आम्ही सांगितले माणसे तरी पाठवा.

**मा.सभापती** – ते टेंडर काढायचे कोणी.

**श्रीम.नम्रता मगर, उदयान अधिकारी** – चार वार्डात एकच हायट्रोलिकची गाडी आहे. आम्ही पण सांगितले आहे पत्र दिले आहे.

**मा.सभापती** - तुम्ही आजच्या मिटिंग ला यायचे नव्हते ना तुम्ही का आला त्याच्या मिटींगला.

**मा.सुजाता सुनिल पालांडे** - मा.सभापती जर बोलावले नाही तर मीटिंग पुढे तशीच चालेल.

**मा. थोरात ज्ञानेश्वर मुरलीधर** – मा. अध्यक्ष साहेब तसेच अधिकारी थोरात साहेब माझे सहकारी नगरसेवक, अधिकारी खरेतर मा. अंबरनाथजी कांबळे यांनी गेली साडेचार वर्षे चांगला कारभार केला आणि प्रत्येकाला बोलू दिले, तरी त्यांचे अभिनंदन व आभार व्यक्त करतो. कारण ही शेवटची सभा आहे. त्यांनी अध्यक्ष म्हणून चांगले काम केले आणि मला त्यांच्या सोबत काम करायला मिळाले माझे भाग्य समजतो. कांबळे साहेबांना योग्य मार्गदर्शन व काम केले मी सर्वांच्या वतीने कौतुक आणि अभिनंदन करतो. आणि अधिकारी वर्ग थोरात साहेब असतील अशा राऊत मॅडम होत्या त्यांच्या सेवेत काम करायला चांगले

CamScanner

वाटले आमचे देवरे साहेब असतील आम्ही जे जे काम सांगू ते सगळे कामे पटपट व्हायची. आम्ही स्वीकृत नगरसेवक असलो तरी. खरच आम्ही मनापासून पाणीपुरवठा ड्रेनेज आरोग्य यांचे आभार मानतो. मी पण एक कामगार आहे आपण सगळे कामगार आहोत. आपले ठरलेले काम करणे हे आपले कर्तव्य आहे. तुमचे सगळ्यांचे अभिनंदन करतो मला सहकार्य केल्याबद्दल. तुमचे आभार मानतो विशेषता आमच्या अध्यक्षांच्या सर्वांच्या वतीने आभार मानतो अभिनंदन करतो आणि थांबतो.

**मा.कणसे संजय गुलाब –** मा. अध्यक्ष आणि अधिकारी आज स्वीकृत सदस्य मिळाल्यानंतर चार वर्षे पूर्ण झाली आहे. या चार वर्षांमध्ये माननीय सभापती यांनी जवळजवळ पाच वर्षे चांगले काम केले आनंदाची बाब म्हणजे आमच्या दापोडी चे नगरसेवक असतील काटे, राजू भाऊ बनसोडे असतील, माई काटे असतील, अशाताई शेडगे असतील वार्डातील कामाला कधी कोणत्या प्रकारची अडचण येऊ दिली नाही. काम सांगितले की आमचा स्थापत्य विभाग, पाणीपुरवठा विभाग असेल आम्हाला छान मदत केली. अण्णांची कामे चांगल्या असल्यामुळे त्यांना सलग चार वर्षे सभापतीपद मिळाले. कामाचे नियोजन याबाबत माननीय अध्यक्ष आणि अधिकारी यांचे आभार मानतो. आणि काल दापोडी गावांमध्ये पिसाळलेले कुत्रे एक लहान मुलाला चावले आहे. मी कॉल केला तर नऊ वाजता गाडी येईल पण बारा वाजे पर्यंत गाडी आली नाही. येथे भटकी कुत्री खूप झाली आहेत.

**मा.सुजाता सुनिल पालांडे -** शेवटची मिटींग आहे. मा. चेअरमन, अण्णा तुमचे कौतुक आहे चार वर्ष तुम्ही ज्या पद्धतीने त्या खुर्चीचा मान राखला. तुम्ही आम्हाला आमच्या सर्वांचे काम करण्यासाठी तुम्ही ज्या पद्धतीने झटलात कोणतेही प्रॉब्लेम राहिला तर तुम्ही 100% फोन करून विचारले ताई त्या कामाचे काय झाले. त्यामुळे तुम्हाला प्रथमत: माझ्या संत तुकाराम नगर मधील माझ्या प्रभाग क्र.२० च्या नागरिकाकडून तुमचे आभार मानते. त्याचप्रमाणे तुमच्या बाजूची खुर्ची आहे प्रभाग अधिकारी पहिल्यांदा राऊत मॅडम होत्या. श्री.हराळे साहेब होते आता तुम्ही थोरात साहेब आहात प्रत्येकाने आपापल्या परीने छान पद्धतीने काम केले. प्रत्येक अधिकाऱ्याचे आभार मानते. पाण्याचे झाले ड्रेनेचे झाले. मी सगळ्यात जास्त कौतुक कोणाचे करायचे झाले तर आमचे ड्रेनजचे संदीप लोहकरे यांचे कौतुक करेल त्यांनी ज्या पद्धतीने माझा वॉर्ड संभाळा त्याला खरोखर हॅन्डसॉफ आहे. त्यांने खरेच खूप सुंदर असे काम केले आहे. माझे पाणीपुरवठ्याचे गर्जे साहेब असतील त्यांनी आम्हाला कधीही फोन केला तर त्यांनी आमचे फोन उचलले आहेत आणि कधीकधी त्यांना कोविड झाला असतानाही त्यांनी फोन उचलले त्यांच्या घरात कुणी आजारी असले तरी त्यांनी फोन उचलला. गर्जे साहेब खरोखर थँक्यु सो मच. त्यानंतर माझे विद्युतचे जे अधिकारी आहे धुमाळ साहेब आहे त्यांनी ज्या पद्धतीने काम केले आहे त्यांचे सुद्धा खूप खूप धन्यवाद. शेवटचे आमचे अधिकारी आरोग्याचे त्यांनी अजूनही काम सुधरावे आणि त्यांनी सुधारले पाहिजे. कारण आरोग्य महत्त्वाची गोष्ट आहे माझ्या वॉर्डासाठी त्यांना सुद्धा धन्यवाद. कारण कोविडच्या काळामध्ये त्यांचे जे काम झाले आहे ते आमच्या कोणत्याही डिपार्टमेंटचे झाले नाही. त्यापेक्षा आमचे चतुर्थ श्रेणी कर्मचारी आहे आरोग्याचे ते त्यांनी जे काही काम केले आहे करोणाच्या काळात पॉझिटिव्ह असलेल्या घराघरांमध्ये जाऊन जनजागृती करण्याचे प्रयत्न करीत होते. त्यांना व त्यांच्या कामाला मानाचा मुजरा. त्यांना सुद्धा हॅन्डसफ. शेवटचे रस्ते कसे दिसतात. तो माझ्या स्थापत्याने सांभाळला, स्थापत्याने ज्या पद्धतीने काम केले त्याबद्दल मोरे साहेब असतील त्यानंतर गवळी साहेब असतील राऊत साहेब, भोसले साहेब यांनी ज्या पद्धतीने काम केले त्याबद्दल खूप खूप आभार. या सर्वांचे मनापासून आभार मानते. पण जाताना अजून एक गोष्ट सांगते तरी पूर्णत: आमचा सगळा वेळ आमच्या नगरांमध्ये जात असतो. तो जात असताना त्यांच्यासाठी जे काम करायचा आहे त्यासाठी आम्ही तुम्हाला कधी कधी कळत नकळत आरडाओरडा केलेला असतो. कुठला एखादा शब्द केला असेल त्याबद्दल तुम्हा सर्वाची पुन्हा एकदा माफी मागत आहे. पुढच्या वेळी येथे एकत्र काम करणारच आहोत. धन्यवाद.

**मा. काटे स्वाती (माई) चंद्रकांत -** अध्यक्ष महाराज तुमचे सगळयांनी कौतुक केलेले आहे आणि मीही कौतूक करते. आणी थोरात साहेबांचे कौतुक यासाठी करते थोरात साहेब ज्या दिवशी रुजू झाले त्या दिवशी स्वत:हून कॉल केला मी ह क्षेत्रीय कार्यालयात अधिकारी म्हणून रुजू झालेलो आहे. बाकीचे सर्व अधिकारी पाणीपुरवठा विद्युत साहेब, दुर्गे साहेब, धुमाळ साहेब यांना कधीही कॉल केला तर कॉल घेतात आणि नाही घेता आले तर परत ते रिप्लाय करतात. दोन महिन्यापूर्वी प्रभागात फुगेवाडी मध्ये छत्रपती शिवाजी

CamScanner

महाराजांच्या पुतळयाचे उद्घाटन झाले साहेब. खरच प्रभागांचे अधिकाऱ्यांचे सगळयांचे स्थापत्यवाले विद्युतवाले कौतुक करते. गेल्या तीस वर्षात फुगेवाडीत असा कार्यक्रम झाला नव्हता तो इतका छान कार्यक्रम झाला. इतके छान सहकार्य केले त्याबद्दल सर्व अधिकाऱ्यांचे अध्यक्ष तुमचे थोरात साहेबांचे खूप मनापासून आभार मानते आणि धन्यवाद देते. पाणीपुरवठ्याची मोरे साहेब यांना रात्री १, २ ला कॉल केला तरी उचलतात. आम्हाला खुप सहकार्य केले. आता कोरानाची साथ माझ्या घरात २२ पेशंट आणि माझा मुलगा पण करोना पॉझेटिव्ह. आयुक्त साहेबांना कॉल केला तर बोलले कधी व्हीजिट करू. उद्या सकाळी नऊ वाजता येऊ का१ मा.हार्डीकर साहेब सकाळी नऊ वाजता आले सगळा वॉर्ड पिंजून काढला त्याबाबत आरोग्याचे मी मनापासून आभार मानते. धन्यवाद देते. लसीबाबत ही आम्हाला खूप सहकार्य केले मदत केली. धीर दिला. घाबरून जाऊ नका म्हणून डॉ. आंबेडकर मॅडम यांना धन्यवाद देते. त्यांना तर खूप कॉल केले फोनच्या बाबतीत धुमाळ साहेब दुर्गे साहेब भोसले साहेब मोरे साहेब खूप फोन केले अवघड प्रश्न असतात नागरिक आम्हाला विचारतात म्हणून आम्ही तुम्हाला कॉल करतो. आज पर्यंत जसे सहकार्य केले त्याबद्दल आभार मानून धन्यवाद देते.

**मा. काटे स्वाती (माई) चंद्रकांत -** एक विषय राहिला ते हरिदास साहेबांना बघून मला आठवले ते टॉयलेट बांधून झाले आहे इतक्या अडचणीच्या ठिकाणी टॉयलेट बांधून झाले आहे. ते इतके सुंदर त्यांनी केले आहे. व्यायाम शाळा आणि सांस्कृतिक भवन सुद्धा सुंदर केले आहे. स्वतः महापौर साहेबांनी त्यांना विचारले हे काम कसे केले ते इतके अवघड काम होते. ते दुसरी आनंद नालंदा विहार नालंदा विहाराची अशी परिस्थिती होती. हरिदास साहेबांनी सांगितले ताई की मी ते तीन महिन्यात काम पूर्ण करून देतो खरच त्यांनी खूप चांगला पाठपुरावा केला आणि ते काम मार्गी लावले आणि त्या कामाचे उद्घाटन झाले. तसेच उद्यानाचे पण मी आभार मानतो धन्यवाद देते.सभापती आपला प्रभाग नवीन झालेला आहे.

मा.सभापती -

**मा. सभापती –** आपले ह क्षेत्राय कार्यालय नवीन कार्यालय तयार झाले. आणि नविन कार्यालय तयार होताना आमच्या आशाताई शेडगे, असतील पालांडे ताई असतील, थोरात साहेब असतील, आमच्या माई असतील चौगुले ताई असतील आमचे प्रभाग २० असु दया ३०, ३१ ३२ असु दया मी नविन नगरसेवक होतो सगळयांनी मला चांगले सहकार्य केले . आज बोलायचा शेवटचा दिवस आहे.मला महापालिके सभेत आशाताई शेडगे यांनी मला पाहिले आमच्या सगळयांच्या लाडक्या ताई पलांडे ताई यांनी मला पाहिले थोरात साहेब संजू, माई यांनी मला पाहिले सहा महिने मला काहीच कळत नव्हते मला असे वाटायचे मी कसा नगरसेवक झालो. काही विषय असतील तर पलांडे ताईंना सांगायचे शेडगे ताईनां जरा वेगळया गोष्टी असे आमचे पाच वर्ष् गेलि या पाच वर्षात काम करताना मला सर्वांचाच अनुभव मिळाला. त्यांचा अनुभव घेवून बोलायचो मग मला कधी कधी पाठीवर थाप मिळायची की तु हे कुठून आणतो हे सेगळे मला आठवते माई मला बोलयाचा असे आपण सर्वानी मिळून काम केलेले आहे. आता सर्व नगरसेवकांनी स्थापत्य असेल सर्व अधिकारी, डेनेजचे असतील सर्व अधिकारी, आरोग्याचे सर्व अधिकारी, पाणीपुरवठा व विदयुतचे सर्व अधिकारी, उदयानचे असतील, झोनिपुचे सर्व अधिकारी, जलनि:सारनचे असतील तुम्ही लोकांनी साथ दिली आणि नगरसेवकांचा अनुभव मला मिळत गेला मी मिटींग घेत गेलो सगळयानी आपली नांवे घेतली आपण खरेच चांगले काम केले आहे. आपल्या प्रभागातील मिटींग कधी रदद झाली नाही. लोक आम्हाला त्रास देतात म्हणुन आम्ही तुम्हाला बोलायचो आमचे काय तेव्हा आमचे घरातील काम आहे का आम्ही लोकांचीची कामे तुमच्याकडे येवून सांगयचो. हे पाच वर्षे होता होता मी घारांच्याना पण काल बोललो आता माझी पाच वर्षे संपली तुम्हीपण माझी घारची लोक आहात. सर्व नगरसेवक माझे मार्गदर्शक आहेत. आज शेवटची मिटींग आहे आणि आपण सर्वानी असेच काम करावे सर्व कामे चांगल्या प्रकारे झालेली आहे. खरेच हे पाच वर्षे आम्ही आनंददाने घालविली आहेत. सगळया अधिका-यांना मोठी मोठी पदे मिळावी सेगळे आयुक्त पदांपर्यन्त जावेत. मला सगळयांचा आर्शिवाद मिळाला व पुढेही मिळावा ही अपेक्षा करतो.

CS CamScanner

माहे फेब्रुवारी २०२२ ची दिनांक १७/०२/२०२१ रोजी झालेल्या सभेस सर्व सन्मा.सदस्यांचे व सर्व विभागाचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे आभार मानून मासिक सभेचे कामकाज संपलेचे जाहीर करण्यात आले.

Kamble
अंबरनाथ चंद्रकांत कांबळे
सभापती, ह प्रभाग समिती,
कासारवाडी – पुणे -३४

क्षेत्रीय अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ह क्षेत्रीय कार्यालय
कासारवाडी –पुणे -३४

क्र.हक्षेका/कावि/३७म/२०२२
दिनांक - ११/०३/२०२२